UNDP-GCF Project "Enhancing Climate Resilience of India's Coastal Communities" (२४०६ B२७२) या प्रकल्पांतर्गत निधी वितरीत करण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**वन विभाग**
**शासन निर्णय क्रमांक :- एस-१०/२०२६/प्र.क्र.२९६/वने-०३**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,
**दिनांक : २२ ऑक्टोबर, २०२६.**

**वाचा :-**

१. वित्त विभागाचे शासन परिपत्रक क्र. अर्थसं-२०२६/ प्र.क्र.४०/अर्थ-३, दि. ९.०४.२०२६.

२. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे दि. १४.०८.२०२६.

**प्रस्तावना :-**

UNDP-Green Climate Fund यांच्या आंशिक अर्थ सहाय्यातून "Enhancing Climate Resilience of India's Coastal Communities" या प्रकल्पाच्या सह-आर्थिक बांधिलकीने राज्यात राबविण्याच्या प्रस्तावास दि. १०.०६.२०२१ रोजी मा. मंत्रीमंडळाने दिलेल्या मान्यतेनुसार शासन निर्णय दि.१.०७.२०२१ अन्वये प्रकल्पाची रुपरेषा स्पष्ट करण्यात आली आहे. सदर प्रकल्पाची प्रगती तसेच प्रस्तावित नियोजन व पार्श्वभूमी विचारात घेऊन शासन निर्णय दि. १९.०५.२०२६ अन्वये सदर प्रकल्पाच्या कालावधीस दिनांक २८ जून, २०२७ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.

२. UNDP-GCF Project "Enhancing Climate Resilience of India's Coastal Communities" (२४०६ B२७२) या लेखाशिर्षात सन २०२६-२७ करिता एकूण रु. ९५०.०० लक्ष (०२- मजूरी- रु. ३८०.०० लक्ष, २१- साहित्य व पुरवठा- रु.५२२.५० लक्ष व ५०-इतर खर्च रु.४७.५० लक्ष) निधी अर्थसंकल्पित करण्यात आला आहे.

३. प्रस्तुत योजनेअंतर्गत सन २०२६-२७ या चालू वर्षात कांदळवन कक्षातील पुन:स्थापन रोपवन, कांदळवन रोपवन, नर्सरी कामांकरिता आवश्यक एकूण रु.९८.०८४५५ लक्ष (०२- मजूरी- रु. ९१.३०६११ लक्ष, २१-साहित्य व पुरवठा- रु. ६.७७८४४ लक्ष) निधी वितरीत करण्याचा प्रस्ताव अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांनी संदर्भ क्र. २ च्या पत्रान्वये शासनास सादर केला आहे.

४. वित्त विभागाच्या दि. ९.०४.२०२६ रोजीच्या परिपत्रकाच्या मर्यादेत बी.डी.एस. (BDS) प्रणालीवर वितरणासाठी उपलब्ध निधीपैकी एकूण रु. ९१.३०६११ लक्ष (०२- मजूरी- रु. ९१.३०६११ लक्ष) निधी तसेच वित्त विभागाने मान्यता दर्शविल्यानुसार रु. ६.७७८४४ लक्ष (२१-साहित्य व पुरवठा- रु.६.७७८४४ लक्ष) निधी असे एकूण रु.९८.०८४५५ लक्ष निधी वितरणासाठी उपलब्ध आहे. सदर उपलब्ध निधी वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय:-**

सन २०२६-२७ करिता UNDP-GCF Project "Enhancing Climate Resilience of India's Coastal Communities" (२४०६ B२७२) अंतर्गत कांदळवन कक्षातील पुन:स्थापन रोपवन, बांबु रोपवन,

कांदळवन रोपवन, नर्सरी कामाकरिता आवश्यक एकूण रु. ९८.०८४५५ लक्ष निधी खालील तपशिलानुसार तसेच अटींच्या अधीन राहून खर्च करण्यास मंजूरी देण्यात येत आहे:-

(रक्कम रु. लाखात)

| अ.क्र. | कामाचा तपशिल | मागणी | | एकूण वितरीत रक्कम |
|---|---|---|---|---|
| | | ०२- मजुरी | २१- साहित्य व पुरवठा | |
| १ | पुन:स्थापन रोपवन, कांदळवन रोपवन, नर्सरी | ९१.३०६११ | ६.७७८४४ | ९८.०८४५५ |
| | | एकूण | | ९८.०८४५५ |

१) ज्या प्रयोजनासाठी खर्चास मंजूरी देण्यात आली आहे, त्याच प्रयोजनावर निधी खर्च करण्यात यावा.
२) यामध्ये कोणत्याही प्रकारची वित्तिय अनियमितता होणार नाही, याची पुरेपूर दक्षता घेण्यात यावी.
३) वित्त विभागाने दि. ११.०७.२००१ च्या शासन निर्णयान्वये विहित केलेल्या वित्तिय मर्यादा यापुढेही लागू राहतील.
४) सदर मान्यता ही सन २०२६-२७ या कालावधी करिताच देण्यात येत आहे. यास्तव, दि. ३१.०३.२०२७ पर्यंत संपुर्ण निधी खर्च होईल यांची दक्षता घ्यावी.
५) सदर कामे करताना वन (संवर्धन एवं संरक्षण) अधिनियम, १९८० चा भंग होणार नाही, याची दक्षता घेण्यात यावी.
६) निधी वितरीत करताना प्रस्तुत कामे दुबार होत नसल्याची खातरजमा करावी.
७) खर्चाच्या अनुषंगाने उपयोगिता प्रमाणपत्र सादर करण्यात यावे.

२. सदर खर्च हा मागणी क्रमांक- सी-७, २४०६ वनीकरण व वन्यजीवन यावरील भांडवली खर्च UNDP-GCF Project "Enhancing Climate Resilience of India's Coastal Communities" (२४०६ B२७२) या शीर्षाखाली दर्शविण्यात यावा व सन २०२६-२७ मध्ये मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा. निधी खर्च करताना वित्त विभागाच्या वेळोवेळी निर्गमित केलेल्या परिपत्रकातील अटी व सूचनांचे पालन करण्यात यावे.

३. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौ.सं.क्र.६५९/२०२६/व्यय-१०, दि.३१.०८.२०२६ च्या मान्यतेने आणि शासन निर्णय क्रमांक वि.अ.प्र.-२०१३/प्र.क्र.३०/ २०१३/विनियम/भाग-२, दि. १७.०४.२०१५ भाग पहिला उप विभाग-३ परिच्छेद २७ (२) अन्वये व वित्त विभागाच्या परिपत्रक दि. ९.०४.२०२६ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारास अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२६१०२२१५१६२२९६४० असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

JITENDRA S RAMGAOKAR

Digitally signed by JITENDRA S RAMGAOKAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Revenue and Forests Dept, 2.5.4.20=DA1BD25BE62F91C7B60749717D63394F115854B1B30C0D7CDA850348D6A12577, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=067F696C19CDAEAD50B2E37C6C5A94DB09F968C45E35C16617050C2A9D057202, cn=JITENDRA S RAMGAOKAR
Date: 2026.10.22 15:17:37 +05'30'

(डॉ. जितेंद्र रामगावकर)
मुख्य वनसंरक्षक (मंत्रालय)

**प्रत :-**

१) प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर.

२) प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
३) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास) महाराष्ट्र राज्य, नागपूर.
४) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (संधारण) महाराष्ट्र राज्य, नागपूर.
५) महालेखापाल-१/२ (लेखा व अनुज्ञेयता/ लेखा परीक्षा), महाराष्ट्र राज्य, मुंबई / नागपूर.
६) मुख्य वनसंरक्षक (कांदळवन कक्ष), मुंबई.
७) मुख्य वनसंरक्षक (भूमी अभिलेख कक्ष), नागपूर.
८) विभागीय वन अधिकारी, कांदळवन विभाग, उत्तर कोकण.
९) विभागीय वन अधिकारी, कांदळवन विभाग, दक्षिण कोकण.
१०) वित्त विभाग, व्यय १०/ अर्थसं-४ मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
११) कार्यासन अधिकारी, ब-१, महसूल विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
१२) कार्यासन अधिकारी (फ-२), वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
१३) निवडनस्ती.